# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

दिनांक: / /२०२०

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जिल्हा – सोलापूर – ४१३३०४

विषय :– * श्री.विठ्ठलाची / श्री.रूक्मिणीची / श्री.विठ्ठल व रूक्मिणी या दोन्हींची चंदनउटी पूजा करण्याची परवानगी मिळणे बाबत.

अर्जदाराचे पूर्ण नांव : श्री ——————————————————————

संपूर्ण पत्ता : ——————————————————————

——————————————————————

पिन कोड ————————

संपर्क क्रमांक : ————————————

इमेल आयडी : ——————————————

महोदय,

विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, मला माझे कुटूंबातील व्यक्तीसह *श्री. विठ्ठलाची / श्री.रूक्मिणीची / श्री. विठ्ठल व रूक्मिणी या दोन्हींची चंदनउटी पुजा करावयाची आहे. त्यासाठी दिनांक / /२०२० रोजीची चंदन उटी पूजा करणेची संधी मला मिळणेस विनंती आहे. त्यासाठीची देणगीची रक्कम रू. ———/– मी डिमांड ड्राफ्टने/ रोखीने भरलेली आहे. (श्री. विठ्ठलाच्या पूजेसाठी रू. **१७०००/–** व श्री. रूक्मिणीच्या पूजेसाठी रू. ८५००/– आणि दोन्ही पुजेसाठी रक्कम रू. **२५५००/–** भरणे आवश्यक आहे.) सदरच्या चंदन उटीपूजेबाबतच्या मंदिर समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत. त्याचे मी व माझे सोबतच्या व्यक्ती तंतोतंत पालन करू.

१. चंदनउटी पूजेच्या वेळी माझे कुटूंबातील ज्या २ व्यक्तींना (पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले या पैकी २ व्यक्ती) पूजेसाठी श्री. विठ्ठलाच्या गाभाऱ्यात प्रवेश द्यावयाचा आहे त्यांची नावे –

| अ.क्र. | पूर्ण नांव | वय | विवाहीत/ अविवाहीत | अर्जदार भाविकाशी नाते |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

**२.** या चंदनउटी पूजेच्या वेळी माझे खाली नमुद केलेले ८ नातेवाईक मंदिरातील चांदीच्या कमानी जवळ बसून पूजा पाहण्यासाठी उपस्थित राहतील. (त्यांना गाभाऱ्यात प्रवेश असणार नाही.)

| अ.क्र. | पूर्ण नांव | वय | विवाहीत/ अविवाहीत | अर्जदार भाविकाशी नाते |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |

(या सर्वाच्या फोटो ओळखपत्रांच्या झेरॉक्स प्रती मी सोबत जोडल्या आहेत.)

३. देणगी डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅंकेचे नांव, डीडी क्रमांक व दिनांक (सोबत डीडी जोडला आहे.)

——————————————————————————————

४. देणगी रोख भरली असल्यास पावती क्रमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

——————————————————————————————

५. सदरच्या चंदन उटीपूजेबाबतच्या अर्जापाठीमागे छापलेल्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना मान्य आहेत. त्यांचे आम्ही तंतोतंत पालन करू.

तरी मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना दिनांक / /२०२० (वार – ) या तारखेला * श्री. विठ्ठलाची / श्री. रूक्मिणीची / श्री. विठ्ठल व रूक्मिणी या दोन्हींची चंदन उटीपूजा करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,

————————————

टिप –

१. चंदनउटी पुजेच्या अटी, शर्ती व नियम मान्य असले बाबत अर्जदाराने पाठी मागील बाजूस सुध्दा सही करावी.

**२.** * लागू नसेल ते खोडावे.

## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

**चंदनउटी पुजे बाबतच्या अटी, शर्ती व नियम —**

१. सदरचे पूजेसाठीचे अर्ज **दिनांक ०९/०३/२०२०** पर्यंत पोष्टाने/समक्ष स्वीकारण्यात येतील.

२. चैत्र शुध्द २ ते जेष्ठ शुध्द ६ (दिनांक २५/०३/२०२० ते दिनांक दि. ०६/०६/२०२० पर्यंत) या कालावधीतील शुध्द दशमी, एकादशी, व्दादशी व वद्य एकादशी या दिवशी आणि चैत्र शुध्द ५ ते शुध्द १५ हे दिवस वगळता उर्वरीत दिवसासाठी अर्ज करता येईल. जाहीर निवेदनात नमुद केलेल्या ०२१८६ — २२४४६६, २२३५५० या क्रमांकावर संपर्क साधून आपल्याला हवी असलेली तारीख उपलब्ध असलेची खात्री करून नंतरच अर्ज भरून पाठवावा.

३. **चंदनउटी पूजेसाठीची देणगी (दुपारी ४.३० ते ५.३० या वेळेत)** देणगी (श्री. विठ्ठलाच्या पूजेसाठी रू. ............/— व रूक्मिणीच्या पूजेसाठी रू. ................/— व दोन्ही पुजेसाठी रक्कम रू. ............./—) भरणे आवश्यक आहे. अर्जासोबत देणगीचा डीडी किंवा देणगी रोखीने भरली असल्यास पावतीची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

४. एका दिवशी फक्त **दोनच** कुटुंबांना चंदन उटीपूजा करण्यास परवानगी देण्यात येईल. प्रथम येणाऱ्या अर्जास अगोदर आणि नंतर येणाऱ्या अर्जास नंतर पूजेचा मान देण्यात येईल.

५. चंदन उटीपूजेच्या वेळी समितीच्या उपस्थित पुजाऱ्यांमार्फत ज्या सूचना देण्यात येतील, त्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.

६. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छूक भाविक व त्यासोबतच्या १० व्यक्तींना पुजेचे दिवशी दुपारी ४.०० वा. व्हीआयपी गेट येथून प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाचे वेळी इकडील पूजा मंजुरीचे मुळ पत्र व सर्वाची मुळ ओळखपत्र तपासून प्रवेश देण्यात येईल. पूजेला मंदिरात येताना पादत्राणे व कॅमेरा इ. वस्तू सोबत आणता येणार नाहीत.

७. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छूक भाविकांच्या कुटूंबातील २ व्यक्तींना (पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले व जवळचे नातेवाईक या पैकी २ व्यक्ती) पूजेसाठी श्री. विठ्ठलाच्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जाईल. अशा व्यक्तींची नावे अर्जात नमुद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्यावेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

८. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छुक भाविकांच्या कुटुंबातील वर नमुद व्यक्तीशिवाय, नात्यातील अन्य ८ व्यक्तींना मंदिरातील चांदीच्या कमानी जवळ बसून पूजा पाहता येईल. त्यांना गाभाऱ्यात प्रवेश दिला जाणार नाही, अशा ८ व्यक्तींची नावे अर्जात नमुद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्यावेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

९. श्री. विठ्ठलाचे व रूक्मिणीचे पोषाख झालेनंतर समितीच्या पुजाऱ्या मार्फत चंदन उटी सुरू करण्यात येईल. त्यावेळी वर नमुद दोन व्यक्तींना श्रीं. च्या मुर्तीला दोन मिनीटे चंदन उटी लावण्याचा मान दिला जाईल. त्यावेळी हलक्या हाताने मुर्तीची झीज होणार नाही अशा पध्दतीने चंदन उटी लावणे आवश्यक राहील. उर्वरीत चंदन उटी समितीच्या पुजाऱ्या मार्फत करण्यात येईल. त्यानंतर आपणाकडील १० व्यक्ती मार्फत श्रीं. स तुळशी हार फुले अर्पण करून त्यानंतर श्री. विठ्ठलाचे / श्री. रूक्मिणीचे पदस्पर्श दर्शनाचा लाभ घेता येईल. त्यानंतर समितीमार्फत उपलब्ध होणारा फळे व पेढे व पोहे आणि शिऱ्याचा नैवेद्य आपल्या मार्फत दाखविला जाईल. त्यानंतर आपणास प्रसाद देणेत येईल.

१०. चंदन उटीपूजेसाठी येत असले बाबतचा खात्रीशीर निरोप पूजेच्या आदल्या दिवशी सायंकाळी ६ वाजे पर्यत नित्योपचार विभागास देणे आवश्यक आहे.

११. एकदा पूजेचे बुकींग केले नंतर कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही व देणगीची रक्कम परत मागता येणार नाही.

१२. अति महत्वाच्या कारणांसाठी आपली पूजा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. त्यावेळी पूजेची पुढील उपलब्ध तारीख आपणांस देण्यात येईल.

१३. अपूर्ण माहिती भरलेले आणि अर्जात नमूद केलेली कागदपत्र न जोडलेले अर्ज नामंजूर करण्यात येतील.

१४. आपला अर्ज इकडे प्राप्त होण्यास पोस्टा मार्फत विलंब झालेस. हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**अटी, शर्ती व नियम मान्य असलेबाबतची**
**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी** } ————————————————
————————————————————————